# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२७/७/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०८) इतिवृत्त**

सोमवार, दिनांक २७ जुलै २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३५ वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म)श्री. उध्दव घुगे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. जावेद हसन खान
०३. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०९. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१०. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१२. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
१३. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

सौ.मोमीन सफिया : सलीम अली सरोवर मध्ये ड्रेनेजचे पाणी येते. यामुळे सिडको हडको भागात दुर्गंधी येते. हे काम करण्या बाबत मंजूरी दिली नंतर सर्वसाधारण सभेपूढे ठेवले अद्याप काम केले नाही. अगोदर तेथ्रील आपण पाहणी करावी त्यानंतर सभा घ्यावी.

मा.सभापती : विषयपत्रिका घेवू,त्यानंतर पाहणी केली जाईल.

श्रीमती मेहरून्नीसा खान : सिडको-हडकोतील ड्रेनेज लाईनचे काम न केल्यामूळे घाण पाणी तलावात येते. सर्व सदस्य, मा.आयुक्त व संबधीत अधिकारी यांचे समवेत आताच पाहणी करावी त्यानंतर सभा घ्यावी.

श्री.सतीष कटकटे : तलावाचे सौदर्यीकरणाचे काम चालू असून मोठा खर्च होणार आहे असे असतांना त्यात ड्रेनेजचे पाणी येते. हे बरोबर वाटत नाही प्रथम पाहणी करावी योग्य निर्णय घ्यावा.

श्री.सिताराम सुरे : जाधववाडी, नक्षत्रवाडी ,सलीम अली सरोवर येथे सिव्हेज ट्रीटमेंन्ट प्लांट बांधण्याचा ठराव पारीत झाला त्यानंतर काय कार्यवाही केली पिसादेवी पासून पूढे जाधववाडी ड्रेनेजचे अर्धवट काम राहिले त्यामूळे मार्केट कमेटीच्या जागेत पाणी पसरले त्या परीसरातील.श्रीमती गिरजाबाई वानेकर चंदूलाल वानेकर श्री नागरे नावाचे इतर व्यक्ती आजारी असून उपचार घेत आहे. 12 व्या वित्त आयोगाच्या रक्कमेतून 1.50 कोटीचे सिव्हेज ट्रीटमेंन्ट प्लांटचे काम करावे या संदर्भात मा.महापौर यांनी पत्र दिले होते त्या संदर्भात काय कार्यवाही केली

श्रीमती मेहरून्नीसा खान : सलीम अली सरोवर येथे 4 कोटी सौदर्यीकरणासाठी खर्च होत आहे तलावात आजही घाण पाणी येते ड्रेनेज लाईन बदणार होते कार्यवाही केली नाही.तेथील पाहणी करावी नंतर सभा घ्यावी.

श्री.विनायक पांडे : बजेट लवकर सर्वसाधारण सभेकडे पाठवावे जेणे करून अशी तातडीची कामे करता येईल.

मा.सभापती : बजेट पुस्तक छपाईसाठी जाणार आहे मा.महापौर यांचेशी चर्चा झाली लवकरच बजेट सादर करणार आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान : बजेट सादर करावे अंदाजपत्रक व पुढील कार्यवाहीसाठी वेळ लागणार आहे. आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे वार्डात कामे झाली पाहिजे.

श्री.सतीष कटकटे : स्थायी समितीने बजेट मंजूर केले बजेट नुसार कामास सुरूवात करावी आदेशीत केले परंतु लेखा विभागात संचिका पडून बजेट टाकले जात नाही विकास कामे होणार की नाही.

सौ.मोमीन सफिया : सलीम अली सरोवराची अगोदर पाहणी करावी.

मा.सभापती : विषयपत्रिका संपल्यानंतर पाहणी करण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे : जाधववाडीतील ड्रेनेजचे पाणी,सलीम अली सरोवर या दोन्ही ठिकाणी पाहणी करावी.

(याच वेळी स.सदस्या श्रीमती मोमीन सफिया फिरदोस मा.सभापती डायस समोर बसून सलीम अली सरोवराची पाहणी करण्याची मागणी करतात.)

मा.सभापती : स.सदस्यांनी डायससमोर बसू नये मुख्यलेखाधिकारी यांचा खुलासा झाल्यानंतर पाहणी करण्यात येईल.

मुख्यलेखधिकारी : स्थायी समितीने अर्थसंकल्प मंजूर केला अदयाप या विभागाकडे आलेले नाही परंतु लेखाअनुदानामध्ये लेखाशिर्षाखाली सन 2009-10 मध्ये ज्या कामासाठी तरतुद केली त्या त्या संचिकेमध्ये बजेट टाकले जात आहे.

श्री.सतीष कटकटे : स्पील ओव्हरची कामे सुरू करण्याचे आपण आदेशीत केले होते कामे सुरू झालेली नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान : स्पील ओव्हरची कोणतीच कामे होत नाही.

मुख्यलेखधिकारी : स्पील ओव्हरच्या कामाच्या संचिकेवर बजेट टाकले जात आहे सध्या नवीन कामासाठी टाकले जात नाही.

मा.सभापती : बजेट सादर झाले त्यातील स्पील ओव्हरची व आवश्यक कामास मंजूरी देवून कामास सुरूवात करावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान : संचालक,प्रांणी संग्रहालय हे दुकानदाराची अडवणूक करून वसुली करीत आहे अनेकांच्या तक्रारी लोक मोर्चे वगैरे काढत आहे महापालिकेची बदनामी होत आहे

श्री.सिताराम सुरे : दोन विषय आहे ते घ्यावे त्यानंतर सलीम अली सरोवर जाधववाडी भागातील व्हिजीट करावी.

**विषय क्र. ५० :**

दिनांक ४/७/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ५) इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.नारायण कुचे : दिनांक ४/७/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.३२ मध्ये बन्सीलालनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक हॉलच्या तळमजल्यातील हॉल अध्यक्ष, संत रोहीदास महाराज क्रिडा मंडळास भाड्याने देण्यासाठी इतरांच्या तुलनेत अतिशय जास्त भाडे आकारण्यात आलेले आहे. स्थायी समिती सभा दि.१६/१/२००७ ठराव क्र.२०७ अन्वये नाममात्र भाडे आकारून रिक्त असलेले मनपाचे हॉल सामाजिक संस्थेस/क्रिडा मंडळास भाडेतत्ववावर देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संत रोहीदास महाराज क्रिडा मंडळास प्रतिमहा रू.२०००/- भाडे आकारणी करावी.

श्री.सिताराम सुरे : सनी सेन्टर, कामधेनू हौसींग सोसायटीच्या संदर्भात मागिल बैठकीत मुद्दा उपस्थित केला होता या बैठकीत माहिती देणार होते.

मा.सभापती : संबधीत अधिकारी नाही मा.न्यायालयात कामानिमित्त गेलेले आहेत. आल्यानंतर खुलासा घेतला जाईल. विषय मंजूर करण्यात येतो. स.सदस्य श्री.नारायण कुचे यांनी नमुद केल्याप्रमाणे, दि.४/७/२००९ रोजीच्या सभेतील ठराव क्र.३२ मध्ये बन्सीलालनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक हॉलच्या तळमजल्यातील हॉल अध्यक्ष, संत रोहीदास महाराज क्रिडा मंडळास प्रतिमहा रू.२०००/- भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. या दुरूस्तीसह दि.४/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दि.४/७/२००९ रोजीच्या सभेतील ठराव क्र.३२ मध्ये बन्सीलालनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक हॉलच्या तळमजल्यातील हॉल अध्यक्ष, संत रोहीदास महाराज क्रिडा मंडळास प्रतिमहा रू.२०००/- भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. या व इतर दुरूस्तीसह दि.४/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, नक्षत्रवाडी येथील जुना सेप्टीक टँक तोडून नविन बांधणे व ३०० मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,८९,५००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.२०८ दि.९/२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता सदरील काम श्री.सय्यद वसीम नवाज रझवी या ठेकेदाराकडून अं.प.दरापेक्षा १०७८% कमी दराने करून घेण्यात येत आहे. त्यासही मा.स्थायी समिती ठराव क्र.२५२ दि.२६.२.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

प्रतयक्ष काम करते वेळी खोदकामाचे परिमाणात तसेच ड्रेनेज लाईन टाकण्याचे परिमाणात वाढ होत असल्याने व सदरील काम करणे आवश्यक असल्याने या कामासाठी रक्कम रू.१९,६०,२८९/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

या कामाकरीता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात रक्कम रू.१२.०० लक्षची तरतुद उपलब्ध असतांना रक्कम रू.१४,८९,५००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात आली होती. तरी उर्वरीत रक्कम रू.२,८९,५००/- + सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.४,७०,७८९/- असे एकुण रक्कम रू.७,६०,२८९/- इतकी वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,६०,२८९/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम श्री.सय्यद वसीम नवाज रझवी या ठेकेदाराकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.७८% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.सिताराम सुरे : विषय मंजूर करण्यास विरोध नाही परंतू याच अनुषंगाने जाधववाडी, सलीम अली सरोवर,बनेवाडी भागात सिव्हेज ट्रीटमेन्ट प्लांट बांधण्याचा ठराव पारीत झाला होता त्यावर काय कार्यवाही झाली. जुना सेप्टीक टँक का तोडणार आहे.

कार्य.अभि.(श्री.कुलकर्णी): 20 वर्षापुर्वीचा सेप्टीक टँक असून वांरवार चोकअप होत असल्याने नवीन एक्झेटींग लाईन टाकण्याचा प्रस्ताव केलेला होता यात लांबी 370 मी. होती. मेनहोलची डेप्थ 1.2 मी. होती. पुढे लेव्हल मिळत नसल्याने ॲव्हरेज डेथ ही काही ठिकाणी 3.70 ,3.80 मी. झाली खोली वाढल्याने सॉप्टवर्क हार्डवर्कचे ॲटम वाढले. मेनहोलची उंची वाढली त्यामूळे रक्कम वाढली.

मा.सभापती : प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी येथील जुना सेप्टीक टँक तोडून नविन बांधणे व ३०० मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामात ड्रेनेज लाईन टाकण्याचे परिमाणात वाढ होत असल्याने सदर कामासाठी रक्कम रू.१९,६०,२८९/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.सय्यद वसीम नवाज रझवी यांचेकडून अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५२ :</u>**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गजानन महाराज मंदिर ते त्रिमुर्ती चौक व्हाया हेडगेवार हॉस्पीटल या रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९७,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या विषय क्र.२२३ दिनांक २०/२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील पाचही निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३.१२% कमी दराने |
| २. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १.१% कमी दराने |
| ३. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| ४. | श्री. के.बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा ३.००% जास्त दराने |
| ५. | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ८.०% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१२% कमी असे आहेत. तरी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१२% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज मंदिर ते त्रिमुर्ती चौक व्हाया हेडगेवार हॉस्पीटल या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१२% कमी दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्वान निर्बीजीकरण कार्यक्रम सन २००९-१० साठी चालु ठेवणे बाबत व श्वान निर्बीजीकरण कार्यक्रमाचे उद्दीष्ट चालू वर्षासाठी ५००० प्रजननक्षम श्वानाच्या शस्त्रक्रिया करणेचे उद्दीष्ट ठेवणे व समितीच्या दिनांक ३०/१२/२००८ रोजीच्या बैठकीत खालील निर्णय घेतले आहेत. श्वान निर्बीजीकरण कार्यक्रम खाजगी संस्था मार्फत चालु न ठेवता प्रचलीत खर्च रू.५५०/- प्रति शस्त्रक्रिया ऐवजी कमी खर्चात रू.४००/- प्रती शस्त्रक्रिया खर्च व नोंदणीकृत पशुवैद्यकीय डॉक्टरा मार्फत करून घेणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे. सनियंत्रण समितीच्या निर्णयानुसार श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमाची तांत्रिक कामे नोंदणीकृत पशुवैद्यकीय पदविधराकडून व अतांत्रिक कामे खाजगी व्यक्ती किंवा संस्था मार्फत करण्यात यावीत. सदर कामाचे दर खालील प्रमाणे ठरवण्यात आले.

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | खर्चाची रक्कम | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | (अ) मनपा हद्दीतील विविध ठिकाणाहून कुत्रे पकडून शस्त्रक्रियेसाठी नेमणूक केलेल्या ठिकाणी आणणे. | १००/- | अतांत्रिक |
| २ | ऑपरेशनसाठी व्हेटर्नरी सर्जनचे मानधन (ऑपरेशनसाठीच्या हत्यारा सहित) | ७५/- | तांत्रिक |
| ३ | ॲनेस्थेशिया, ॲटी बायोटिक्स कॅटगट, ॲटी रेबीज लस, इत्यादी औषधी उपकरणे खर्च. | १२५/- | तांत्रिक |
| ४ | ऑपरेशन नंतर खाद्य खर्च, जखम बरी होई पर्यंतची देखभाल, साफसफाई, जखम बरी झाल्यानंतर पुनर्वसन | ७५/- | अतांत्रिक |
| ५ | रेकॉर्ड, केस पेपर, पोस्ट ऑपरेटीव्ह केअर, ड्रेसींग व इंजेक्शन इत्यादी | २५/- | तांत्रिक |
| | एकुण- | ४००/- | |

सदर योजना दिनांक १६.११.२००६ पासून श्वान दंशावर प्रतिबंधासाठी सुरू करण्यात आली असून मोकाट श्वानांना पकडून निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे, रेबिज प्रतिबंधक लसीकरण करणे,

शस्त्रक्रिया जखम बरी होईपर्यंत श्वानांची सुश्रुषा करणे व जखम बरी झाल्यानंतर पकडून आणलेल्या ठिकाणी श्वानाचे पुनर्वसन करणे इत्यादी कामे अंतर्भुत आहेत.

आतापर्यंत सदर योजने अंतर्गत झालेल्या कामाचा वर्षनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | नर श्वान | मादी श्वान | एकुण श्वान | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००६-२००७ | ८०४ | निरंक | ८०४ | ४,४२,२००/- |
| २ | २००७-२००८ | ६८६३ | २६१८ | ९४८१ | ५४,५३,०५०/- |
| ३ | २००८-२००९ | २६३३ | ३०३९ | ५६७२ | २९,३५,१००/- |
| ४ | २००९-२०१० (मे अखेरपर्यंत) | २१७ | ४५२ | ६६९ | २,६७,६००/- |

तरी श्वान निर्बीजीकरण कार्यक्रम सन २००९-२०१० वर्षासाठी पुढे चालू ठेवण्याकरीता सनियंत्रण समितीने निश्चित केलेल्या प्रति श्वान शस्त्रक्रिया खर्चास व अंमलबजावणी साठी विहित केलेल्या पध्दतीनुसार चालु ठेवण्यासाठीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेस सादर.

मा. सभापती : या विषयाच्या संदर्भात माहिती आलेली असून मोठ्या स्वरूपाची आहे. वाचन करण्यास वेळ लागेल. तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५४ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवर येथील पाणी काढणे बाबतच्या कामासाठी दरसूची २००८-०९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये २,१५,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर काम तातडीने करणे आवश्यक होते. करीता सदर काम तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या नियम २ (२) नुसार सदर कामाच्या प्रस्तावास स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सलीम अली सरोवर विकास योजना या लेखा शिर्षामधुन काम प्रस्तावित आहे. करीता मुंबई प्रांतिक मनपा अधि.१९४९ चे प्रकरण ५ नियम २ (२) नुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध गुततेदार श्री.शेख मसूद यांचेकडून करून घेण्याचे मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवर येथील पाणी काढणेच्या कामासाठी तयार केलेले रक्कम रूपये २,१५,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या नियम २ (२) नुसार अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध गुततेदार श्री.शेख मसूद यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक लगत अतिक्रमण काढलेल्या जागेवर खडी रस्ता तयार करून डांबरीकरण करणेच्या कामासाठी जिल्हा दरसूची २००७-०८ नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.९,९५,३५२/- चे तयार करण्यात आले होते. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविल्या असता एकुण तीन निविदा विक्री व प्राप्त झाल्या. प्रापत निविदामध्ये श्री.सचिन वाकळे यांची अं.प.दरापेक्षा ५% कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. परंतु श्री.सचिन वाकळे यांनी

त्यांच्याकडे डांबर कामासाठी आवश्यक असणारी मशिनरी उपलब्ध नसताना चुकीने निविदा दाखल केली होती. त्याबद्दल संबंधीताने सदर निविदा आपण नजरचुकीने भरल्याचे लेखी पत्र देवून त्यांची निविदा रद्द करणे बाबत कळविल्यानुसार त्यांची निविदा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर प्राप्त निविदापैकी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन व मे.आदिनाथ कन्स्ट्रकशन यांच्याकडे सदर कामासाठी आवश्यक असणारी मशिनरी उपलब्ध असल्याने सदर कामाचे प्रथम निविदाधारक श्री.सचिन वाकळे यांच्या अं.प.दरापेक्षा ५% कमी दरामध्ये सदर काम करण्यास तयार असणे बाबत लेखी विचारणा केली असता मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी सदर काम प्रथम निविदाधारकाच्या दरात सदर काम करण्याची लेखी तयारी दाखविल्या नुसार संबंधीतास कार्यादेश देवून काम सुरू करून घेण्यात आले आहे.

प्रस्तावित रस्ता हा क्रांतीचौक येथील चालू असलेल्या उड्डाण पुलात स्लीप वे मध्ये बाधीत होत असल्याने उर्वरीत कामाची आवश्यकता नसल्याने त्याऐवजी पैठणगेट ते सिल्लेखाना या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढलेल्या जागेवरील डांबरीकरणाच्या काही बाबीसाठी कामामध्ये मुळ अंदाजपत्रकात तरतुद नसल्याने त्याबाबींच्या करीता अतिरिक्त बाबी प्रस्तावित करून कामावर होणारा एकत्रित खर्च बचतीमधून होणार असून काम मुळ मंजूर रक्कमेच्या मर्यादेत होणार आहे.

करीता सदर कामाचा स्थळ बदलास व मंजुर एजन्सीकडून अतिरिक्त बाबीस काम करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त करणेची शिफारस केली आहे.

करीता सदर कामाचे स्थळ बदलासह मंजुर एजन्सीकडून अतिरिक्त बाबींसह काम करून घेणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक लगत अतिक्रमण काढलेल्या जागेवर खडी रस्ता तयार करून डांबरीकरण करणेचे काम क्रांतीचौक येथील उड्डाण पुलात स्लीप-वे मध्ये बाधीत होत असल्याने त्याऐवजी पैठणगेट ते सिल्लेखाना या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढलेल्या जागेवरील डांबरीकरणाच्या काही अतिरिक्त बाबीसह मंजुर एजन्सी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून बचतीमधुन स्थळ बदलासह, मुळ मंजुर रकमेच्या मर्यादेत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : स.सदस्य श्री. विनायक पांडे यांनी दिलेल्या प्रस्तावासह ऐनवेळचे प्रस्तावांस मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ५६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.पहाडसिंगपुरा विद्युत कॉलनी प्रभागात जाणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याचे काम तातडीचे असल्यामुळे व सध्या पावसाळा चालु असल्यामुळे तेथील रहिवाश्यांच्या घरात नाल्याचे पाणी जाऊन जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नाल्याच्या घाणीमुळे रोगराई पसरत आहे. तरी सदर अंदाजे रू.१०.०० लक्ष खर्चाचे कामास मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २ (२) अन्वये उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : विनायक पांडे    अनुमोदक : सिताराम सुरे, नारायण कुचे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पहाडसिंगपुरा विद्युत कॉलनी प्रभागात जाणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याचे काम पावसाळा चालु असल्यामुळे तेथील रहिवाश्यांच्या घरात नाल्याचे पाणी जाऊन जिवीत व वित्त हानी होण्याची व घाणीमुळे रोगराई पसरण्याची शक्यता लक्षात घेता अंदाजे

रू.१०.०० लक्ष खर्चाचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २ (२) अन्वये उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.सदस्यांना अर्थसंकल्प पुस्तिका वितरण करतांना प्रतिवर्षी सुटकेस/लगेज बॅग देण्यात येते. सन २००९-२०१० या वर्षाकरिता सदर साहित्य खरेदी करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.२/७/२००९ ते दि.८/७/२००९ पर्यंत निविदा विक्री करण्यात आली. दि.१०/७/२००९ रोजी एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारकांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

१. मे. सागर लगेज, औरंगाबाद.

२. मे. पवन लगेज, औरंगाबाद.

३. मे. कबीरा सेल्स, औरंगाबाद.

दि.१०/७/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता प्राप्त निविदाधारकांचे निविदेचा तांत्रिक लिफाफा (कागदपत्रांचे पाकीट) उघडण्यात आले असता, मे.सागर लगेज, औरंगाबाद यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. परंतू इतर दोन निविदाधारकांनी अनामत रक्कम भरलेली नव्हती व आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत, असे आढळून आले.

दि. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार किमान तीन वैध निविदा प्राप्त झाल्यास, निविदा प्रक्रिया वैध ठरते. सदर निविदाधारकांनी Aristocrat या कंपनीचे साहित्य पुरवठा करण्याकरीता निविदा सादर केल्या होत्या. तथापी तांत्रिक बाबींची पुर्तता न केल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला नाही. सदर साहित्य मा.सर्वसाधारण सभेच्या अर्थसंकल्पीय सभेच्या आधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याकरीता फेर निविदा केल्यास कालापव्यय होईल. तसेच निविदा प्रक्रियेत महानगरपालिकेचा अधिक खर्च होईल. तरी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्थसंकल्प पुस्तिका वितरण स.सदस्यांना प्रतिवर्षी प्रमाणे सुटकेस/लगेज बॅग साठी फेरनिविदेस लागणारा कालावधी लक्षात घेता प्राप्त झालेल्या मे.सागर लगेज, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

वॉर्ड क्र. १८ पवननगर येथील खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे करीता सन २००५-०६ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.९,९८,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन २००७-०८ मध्ये व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखा शिर्ष अंतर्गत रक्कम रू.१०.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली होती. त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असुन सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा ५.५३% कमी दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची प्राप्त झालेली होती. त्यानुसार सदरील काम प्रगती पथावर असुन सदरील कामांतर्गत वाढीव कामे करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.४९१ दि.२.३.२००९ अन्वये रक्कम रू.३.०० लक्ष वळती करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदरील कामासाठी सन २००९-१० अंतर्गत व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखा शिर्षात स्पील ओव्हर मध्ये तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.९,९८,३०० + २९९९०० = १२९८२००/- चा प्रस्ताव व रक्कम रू.२,९९,९००/- चे वाढीव काम, कामाचे मुळ गुत्तेदार

श्री.एस.ए.नवाब यांच्याकडून मुळ मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५.५३% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १८ पवननगर येथील खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामांतर्गत वाढीव कामास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.९,९८,३०० + २९९९०० = १२९८२००/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम, कामाचे मुळ गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांच्याकडून मुळ मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५.५३% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.सतीश कटकटे : महानगरपालिकेच्या मालकीचे मो.गारखेडा परिसर येथील नुपुर व्यापारी संकुलातील दुकान क्र.८ ही महिला बचत गटासाठी देणेबाबत कळविले होते. यास केंद्र शासन पुरस्कृत शहरी रोजगार सुवर्ण जयंती योजनेतून या केंद्रास, केंद्र व राज्य शासनाचे १००% अर्थसाह्य प्राप्त होणार आहे. सदरील दुकान क्र.८ ऐवजी प्रकल्प संचालक महानगरपालिका औरंगाबाद यांच्या विनंतीनुसार जय टॉवर येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.१८ व १९ देण्यात यावी व ही दुकाने लिलाव निविदामधुन वगळण्यात यावी. तसेच पैठणगेट येथील सादिया टॉकीज मागील मनपाच्या व्यापारी संकुलातील दुकान क्र.बी-७, जी-८ व जी-९ ही दुकाने निविदामधुन वगळण्यात यावीत. स्थायी समितीने दिलेली स्थगिती उठविण्यात येत असून उर्वरीत दुकानांसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी कार्यवाही करावी.

मा. सभापती : स.सदस्यांनी निवेदीत केल्यानुसार नुपुर व्यापारी संकुलातील दुकान क्र.८ ऐवजी प्रकल्प संचालक महानगरपालिका औरंगाबाद यांच्या विनंतीनुसार महिला बचत गटासाठी जय टॉवर येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.१८ व १९ देण्यास तसेच पैठणगेट येथील सादिया टॉकीज मागील मनपाच्या व्यापारी संकुलातील दुकान क्र.बी-७, जी-८ व जी-९ ही दुकाने व ही दुकाने लिलाव निविदामधुन वगळण्यास मान्यता देण्यात येते. व मिरा सलामी संकुलातील तळमजला पर्ल एज्युकेश्न ॲन्ड सोसायटी यांना व सुप्रीम एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर सोसायटी यांना तळमजला विभागून देण्यास मान्यता देण्यात येते. स्थायी समितीने दिलेली स्थगिती उठविण्यात येत असून उर्वरीत दुकानांसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी कार्यवाही करावी.

श्री.सिताराम सुरे : सलीम अली सरोवराची पाहणी बरोबर जाधववाडी भागातीलही पाहणी करावी.

मा.सभापती : दोन्ही ठिकाणी पाहणी करण्यात येईल. त्यासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ दु.12.00 वा. पुन्हा दु.1-15 वा.सभेला सुरूवात)

मा.सभापती : सलीम अली सरोवराची नुकतीच पाहणी केली. तेथे एसटीपी प्लांट बाबत काय कार्यवाही करणार खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : सलीम अली सरोवर येथे 5 एमएलडी क्षमतेचा सिव्हेज ट्रीटमेंन्ट प्लांट बांधण्याचे नियोजन होते यासाठी शासनाने मराठवाडा विकास कार्यक्रम 2007 अंतर्गत 25 कोटी मंजूर केले त्यात 25टक्के शासन अनुदान सहभाग असणार उर्वरीत महापालिकेचा असेल.त्याप्रमाणे शासनाकडील 6.25कोटी पैकी 3.13कोटी प्राप्त झाले.हे नुसते सलीम अली सरोवरासाठी नव्हते 4-5 एसटीपी करीता होते. 5-6 ठिकाणी एसटीपी प्लान्ट करण्यासाठी खूप खर्च लागणार आहे. एवढया रक्कमेत काम होणार नाही. त्यासाठी पहिल्यांदा सलीम अली सरोवर मधील प्लांट हाती घेत आहोत. चर्चा झाली त्यानुसार 6.87 कोटीचे अंदाजपत्रक झाले शासनाकडील 6.25 कोटी हे 100 टक्के अनुदान गृहीत धरून एकाच एसटीपी साठी वापरण्याची मान्यता दयावी अशा आशयाचे मा.आयुक्ताच्या सहिने मा.सचिव नगरविकास यांना पत्र व्यवहार केला दोन पत्र पाठविले त्यांचे उत्तर अदयाप आले नाही.सलीम अली सरोवरसाठी टेंडर मागविले ते प्राप्त झाले आहे यासाठी 18.75 कोटीची तरतूद करावी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव होता एवढी रक्कम महापालिकेकडे नाही त्यामूळे हे तुर्त बाजूला ठेवावे असा निर्णय झाला फक्त पाणी पुरवठयाच्या कामासाठी मंजूरी मिळाली.त्यामूळे तुर्त ते बाजूला ठेवले आहे आदेश झाल्यास कार्यवाही करता येईल.

श्री.सिताराम सुरे : सलीम अली सरोवरसह 4-5 ठिकाणी एसटीपी प्लांट करणार होतो सलीम अली सरोवर येथे करणार आहे. नक्षत्रवाडी जाधववाडी येथे एसटीपी प्लांट करण्या ऐवजी बुस्टर प्लांट केल्यास भाविष्यात ते पाणी ड्रेनेज लाईनमध्ये सोडता येईल.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : तो मुद्दा वेगळा आहे तेथे सुध्दा एसटीपी प्लांट करणे आवश्यक आहे.

मा.सभापती : आताच सलीम अली सरोवराची पाहणी केली तेथे ड्रेनेजचे पाणी येते का? त्या बाबतीत खुलासा करावा.

उपअभियंता(स्लम) : 10-15 वर्षापासून ड्रेनेजचे पाणी येते त्यासाठी एसटीपी प्लांट करण्याचे नियोजन केले होते.

श्री.नारायण कुचे : ड्रेनेजचे पाणी तलावात येते हे माहित असतांना सौदर्यीकरणाचे काम हाती घेतले याची कल्पना प्रशासनाला होती का ?

श्रीमती मेहरून्नीसा खान : ड्रेनेजचे पाणी येते आताच प्रत्यक्ष बघीतले ते अगोदर बंद कराचे त्यानंतरच काम करणे योग्य होईल.

उपअभियंता(स्लम) : या ठिकाणी एसटीपी प्लांटचे टेंडर कॉल करण्यात आले. एसटीपी व सलीम अली सरोवर तयार करणेचे प्रिकॉलीफिकेशन वर्क त्यात अंदाजपत्रक तयार करणे व इतर प्रोसेस पुर्ण करणे असे दोन्हीही पॅरलल कामे ड्रेनेज विभागामार्फत चालू आहे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : पुर्णपणे प्लांट करण्यासाठी तेवढा निधी आजरोजी महापालिकेकडे उपलब्ध नाही तुर्त काम बाजूला ठेवले कामाची सर्व प्रोसेस पूर्ण केलेली आहे.

श्री.सतीष कटकटे : 4 कोटी तलावाच्या सौदर्यीकरणासाठी खर्च होत आहे त्याचा उपयोग होणार का? ड्रेनेज मध्ये बोटींग चालू ठेवणार का?

श्री.प्रशांत देसरडा : सलीम अली सरोवर विकसीत करणे व एसटीपी प्लांट अशी दोन कामे करणार होतो. एसटीपीचे काम स्थगित ठेवण्याला दोन महिणे झाले या कालावधीत येथील विकसीत होत असलेल्या कामा बाबत प्रशासनाने काय भुमिका घेतली.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : एसटीपी प्लांटसाठी शासनाने 25 कोटी मंजूर केले त्यात 75 टक्के सहभाग महापालिकेचा असावा म्हणून प्रस्ताव ठेवला होता एवढी मोठी तरतूद महापालिकेकडे नाही म्हणून जो निधी आला तो तुर्त बाजूला ठेवावा व पाणीपुरवठयावरच हा निधी वापरण्यास शासनाकडून मान्यता घ्यावी असा निर्णय झाला

श्री.प्रशांत देसरडा : एसटीपीचे काम लगेच होणार नाही सर्वसाधारण सभेने आलेला निधी बाजुला ठेवण्याचे निर्देश दिले निर्णय होवून दोन महिणे झाले आज रोजी सलीम अली सरोवराचा विकास होत आहे तेथे ड्रेनेजचे पाणी न येण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : पाणी बंद करण्यासाठी काम करावे लागेल टेंडर उन्हाळयामध्ये येथील पाणी कमी होते.त्या भागात पाण्याचा प्रवाह रहावा व ड्रेनेजचे पाणी सुध्दा ट्रीट व्हावे म्हणून एसटीपी प्लांट करण्याचे नियोजन केले ऑलरेडी ड्रेनेजचे पाणी जाण्यासाठी लाईन तेथे आहे जर एसटीपी प्लांट रद्य करायचा असेल तर ड्रेनेजलाईन व्यवस्थीत करून त्याद्वारे पाणी काढता येईल.

श्री.प्रशांत देसरडा : एसटीपी प्लांट सध्या होणार नाही हे माहित असतांना दोन महिण्यात पाण्याची विल्लेवाट लावण्याची कार्यवाही का केली नाही.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : नामंजूर झालेले नाही तूर्त बाजूला ठेवावे असा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे. शासन योजनेतील ते काम आहे.

श्री.प्रशांत देसरडा : 75 टक्के सहभाग महापालिका घेवू शकत नाही हे निश्चित झाले. बजेट सादर करतांना या खर्चाची प्रशासनाने कुठेही तरतूद केलेली नाही याचा अर्थ प्रशासनाला ते काम करायचे नाही.दोन महिण्यात पाणी बंद का केले नाही.

कार्य.अभियंता : ड्रेनेज लाईन तेथे ऑलरेडी आहे.

श्री.प्रशांत देसरडा : ड्रेनेज लाईन असेल तर पाणी कसे येते.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) ड्रेनेजचे तुरळक पाणी येते पावसाचे पाणी आहे.ते न येण्यासाठी काय उपाययोजना करता येईल. याबाबत 2-3 दिवसात पाहणी करून काय उपाययोजना केली ते सादर केले जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : तातडीचे काम म्हणून 5-2-2 मध्ये सादर करावे बजेट सादर करतांना प्रशासनाने तरतूद या कामासाठी तरतूद करायला पाहिजे होती.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवला होता तुर्त बाजूला ठेवावा निर्णय झाला आणखी त्यास स्कोप आहे. स्थायी समितीत निर्णय होवून सर्वसाधारण सभेत त्यावर फेरविचार होवू शकतो.

श्री.प्रशांत देसरडा :येणारे ड्रेनेजचे पाणी बंद करावे यानंतर जेव्हा योजना येईल व महापालिकेची आर्थीक परीस्थिती सुधारलेली असेल अशा वेळी 75 टक्के तरतूद करून एसटीपी प्लांट करावा.

मा.सभापती :एसटीपी प्लांट न करता सध्या ड्रेनेजचे येणारे पाणी बंद करता येईल का ?

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :एसटीपी प्लांट केवळ ड्रेनेजचे पाणी तलावात येवू नये म्हणून करायचे नव्हते तर त्याठिकाणी बोंटींग चालू रहावी याचाही विचार केला होता त्यासाठी पाण्याचा स्त्रोत कायम रहावा उन्हाळयात तलावातील पाणी कमी होते त्यामूळे पावसाचे व ड्रेनेजचे पाणी यास ट्रिट करून सोडल्यास कायमचे पाणी राहू शकते.

मा.सभापती : ड्रेनेजचे पाणी ट्रीट केल्यास पाण्याचा स्त्रोत कायम राहिल याची प्रशासनाला गॅरन्टी आहे का ?

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :पाणी शुध्द व कायमचा स्त्रोत राहण्यासाठी वारंवार देखभाल करावी लागेल.

मा.सभापती :ड्रेनेजचे पाणी बंद होईपर्यत तलावाचा विकास थांबवावा लागेल.

श्री.प्रशांत देसरडा :एसटीपीसाठी 75 टक्के तरतुद करायची की येणारे तुरळक पाणी बंद करायचे या बाबतीत धोरण ठरवावे.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :महापालिका 75 टक्के तरतूद करू शकत नाही 25 कोटीमधील जे 6.25 कोटी मंजूर केले ती रक्कम 100टक्के अनुदान म्हणून ट्रिटकरून एक एसटीपी बांधण्यास परवानगी दयावी अशा आशयाचे दोन पत्र शासनाकडे पाठवून मंजूरीची मागणी केली आहे.पुन्हा पत्र पाठवून प्रयत्न केले जाईल.

मा.सभापती :जसे सलीम अली सरोवर येथील एसटीपी प्लांटच्या बाबतीत 4 कोटीची गुंतवणूक करीत आहे इतर एसटीपी प्लांट साठी अशी गुंतवणूक केली का टेंडर काढून काम सुरू केले का ठेकेदाराला बिल देण्यात आले का सर्व खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : इतर ठिकाणी अशी गुंतवणूक केलेली नाही महराठवाडा विकास कार्यक्रम अंतर्गत सन 2008 मध्ये जे 100 कोटी मंजूर झाले त्यात 30 कोटी हे एसटीपीसाठी असून त्या महापालिकेचा 30 टक्के सहभाग असावा असे आहे.त्या अंतर्गत बनेवाडी येथे एसटीपी प्लांट करण्याचे प्लॅनींग केले मागिल सर्वसाधारण सभेत तुर्त बाजूला ठेवावे असा निर्णय झाला.

श्री.प्रशांत देसरडा : या एसटीपीसाठी जी 100 टक्के अनुदान मंजूर करण्याची शासनाकडे मागणी केली त्यास मंजूरी आली तर चांगलेच आहे येणार नसेल तर ज्या ठिकाणच्या एसटीपीसाठी ग्रॅण्ड आले ते सर्व एकत्रित करून तशी कार्यवाही करावी.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :एकत्रित करून 5-6 ठिकाणी प्लांट करायचे झाल्यास 100-150 कोटी लागणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :एकत्रिक सर्व प्लान्टसाठी शासनाकडून निधी येण्यासाठी पाठवावे.दोन वर्षात कार्यवाही होईल असे प्रयत्न करावे.किंवा जे विविध ठिकाणी एसटीपी प्लांटसाठी शासनाकडून निधी आला तो सलीम अली सरोवरासाठीच वापरावा शासनाशी तसा पत्रव्यवहार करावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :या संदर्भात दोन वेळेस पत्र व्यवहार केला आहे. मा.श्रीवास्तव साहेब हे मागिल मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या वेळी आले होते. 75 टक्के निधी उभारण्यास महापालिकेची तशी परीस्थिती नाही निदर्शनास आणून दिले जो 25 कोटीमधील 25 टक्के 6.25 कोटी शासनाचा सहभाग यास 100 टक्के

अनुदान म्हणून कन्सीडर करून देण्याची मागणी केली. एक एसटीपी प्लांट होईल अशी विनंती केली. शासनाशी तसा पत्रव्यवहार करावा असे म्हटले त्यानुसार दोन वेळेस पत्र दिलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : हे सर्व होणार नाही. सलीम अली सरोवराचे काम बंद करावे असे माझे मत आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :इतर एसटीपी प्लांट स्थगित ठेवून त्यासाठी आलेला निधी सलीम अली सरोवर येथील प्लांटसाठी 100 टक्के अनुदान म्हणून खर्च करावा व शासनास विनंती करावी की महापालिकेचा जो सहभाग ठेवायचा होता तो सर्व प्लांट मध्ये ठेवू शकत नाही त्यामूळे सलीम अली सरोवर येथील प्लांट करण्याचे नियोजित केले आहे.उर्वरीत राहिलेले त्याचे अनुदानाची मागणी करावी शासनाने ठरल्याप्रमाणे त्याही प्लांटला अनुदान दिले तर इतर ठिक्‍ाणचे एसटीपी प्लांटची कार्यवाही करावी.सलीम अली सरोवरातील प्लांटचे काम सुरू करावे.

श्री.प्रशांत देसरडा :सर्व एसटीपी प्लांटसाठी शासनाचा जो सहभाग आहे तो एकत्रित करून 100 टक्के अनुदान एकाच एसटीपीसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्याची विनंती शासनास करावी लोकप्रतिनिधीच्या मार्फत प्रयत्न केले तर एक महिण्यात मंजूरी मिळू शकेल पीएमसी मार्फत कार्यवाही करता येत असेल तर तेही बघावे.

श्री.सिताराम सुरे :इतर ठिकाणचे एसटीपी प्लांट न करता सलीम अली सरोवर येथील प्लांट करण्यात यावा.तेथे सौदर्यीकरणाचे काम चालू आहे ड्रेनेजचे पाणी थांबणे आवश्यक आहे.

श्रीमती मोमीन सफिया :सलीम अली सरोवर मध्ये ड्रेनेजचे येणारे पाणी बंद करावे. त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते.

श्रीमती मेहरून्नीसा खान : ड्रेनेजचे पाणी अगोदर बंद करावे . ड्रेनेजचा प्रश्न सुटत नाही. सलीम अली सरोवरचे काम बंद करावे.

मा.सभापती : आताच प्रशासना सोबत पाहणी केली प्रशासनाचे या बाबतीत काय मत आहे स्पष्ट करावे.

उपआयुक्त(म.) : आताच मा.सभापती, समितीचे सदस्यांनी व प्रशासानाने सलीम अली सरोवराची पाहणी केली असता डायरेक्ट ड्रेनेजचे पाणी येत असल्याचे दिसून आले. रोकण्यासाठी काही उपाय योजना नाही. पुराप्रमाणे येत होते. सरोवराचे सौदर्यीकरण आवश्यक आहे. ड्रेनेजचे पाणी आल्यास मुळ उद्येश बाजूला राहिल.एसटीपी प्लांटचा प्रस्ताव होता शासनाकडून जे अनुदान आलेले आहे त्यात 75-25 असे प्रपोशन आहे 75 टक्के खर्च महापालिका उचलू शकत नाही त्यामूळे एकाच एसटीपीसाठी शासनाने 100 टक्के अनुदान उपलब्ध करून देण्या संदर्भात दोन वेळेस पत्रव्यवहार शासनाकडे केला पुन्हा सविस्तर प्रस्ताव तयार करून मा.सभापती यांचे मार्फत प्रयत्न करून शासनाकडे बाजू मांडून येथील एसटीपी प्लांटसाठी लागणा-या खर्चास मंजूरी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

मा.सभापती :ड्रेनेजचे किती टक्के पाणी येते.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : जमा असलेले 90 टक्के पावसाचेच पाणी आहे. तेथे एसटीपी प्लांट करणे गरजेचे आहे.ड्रेनेज लाईनचे काम केल्यास वारंवार देखभाल दुरूस्ती करावी लागेल व पाण्याचा स्त्रोत कायम राहणार नाही.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेने या संबधीचा प्रस्ताव काय निर्णय घेतला आहे.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :आलेला निधी बाजूला ठेवावा प्रपोरशन बदलून देण्याची शासनाकडून मागणी करावी असे म्हटले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स्थगित आहे रद्द केलेले नाही आता जी कल्पना मांडली त्यानुसार एक एसटीपीसाठी शासनाकडून खर्चास मंजूरी घ्यावी. त्यानुसार कार्यवाही करावी.

मा.सभापती : सलीम अली सरोवर येथे 6.87 कोटी खर्चाचा एसटीपी प्लांटच्या कामाची प्रोसेस सुरू आहे 10-15 वर्षापासून सलीमअली सरोवरात ड्रेनेजचे पाणी येते. एसटीपी प्लांटसाठी शासनाकडून 3.13 कोटीचे अनुदान प्राप्त झाले सर्वासमवेत सलीमअली सरोवराची पाहणी केली असता ड्रेनेजचे पाणी येत असल्याचे दिसून आले एसटीपी प्लांट होत नाही तोपर्यत ड्रेनेजचे पाणी बंद होणार नाही हे निश्चित आहे. या ठिकाणी एसटीपी प्लांट करण्या बाबत शॉर्ट टेंडर काढून काम करण्याची प्रक्रिया सुरू करावी. काय प्रोसेस व कार्यवाही केली त्याचा सविस्तर अहवाल येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.

श्री.सिताराम सुरे : आपण रूलींग दिल्याप्रमाणे पाहणी केली. आपले अभिनंदन जाधववाडी ड्रेनेज लाईनची काय व्यवस्था करणार आहे लोक आजारी पडत आहे.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : मयूरपार्क सुरेवाडी कडून ही लाइन पिसादेवी रोडपर्यत टाकलेली आहे पुढील कामासाठी 12 व्या वित्त आयोगातून 1.50 कोटी निधीची मागणी केली त्यातून 50 लक्ष उपलब्ध झाले तेवढया कामाचे अंदाजपत्रक तयार करून पुढील कार्यवाही करणार आहोत.

श्री.सिताराम सुरे :1.50 कोटी या कामासाठी द्यावे मा.महापौरांनी पत्र दिले.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : पुढे प्रोग्राम रिवाईज झाला त्यानुसार बजेट प्रोव्हीजन कसे आहे याबध्दल मा.शहर अभियंता मा.आयुक्त व मा.महापौर यांचे संयुक्त स्वाक्षरीने या विभागाकडे जो प्रोग्राम आला त्यात 50 लक्ष आले.

श्री्.सिताराम सुरे :50 लक्ष मध्ये सर्व काम होणार नाही.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :पुर्ण काम करायचे असेल तर बजेट वाढवावे लागेल.

श्री.सिताराम सुरे :ड्रेनेज लाईनसाठी निधी पुरेसा नसेल तर मार्केट कमेटीपासून नाला तयार करून त्याद्वारे पाणी सोडता येत असेल तर तशी कार्यवाही करावी.

प्र.सहा.संचालक (न.र.) : डीपी प्लॅनमध्ये नाला आहे की नाही संचिका बघावे लागेल.

श्री.सिताराम सुरे : डीपी प्लॅनमध्ये नाला आहे. मार्केट कमेटीने 1988 साली लेआउट मंजूरी घेतली त्यातही नाला दाखविलेला आहे. नाल्याची खोली वाढविल्यास त्याद्वारे पाणी निघून जाईल. नसता ड्रेनेज लाईन करावी किंवा पिसादेवी रोडला बुस्टर प्लांट करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हा भाग अधिकृत की अनधिकृत आहे तेथे बांधकाम परवानगी दिली आहे का?

श्री.सिताराम सुरे : नाल्याच्या जागेत ज्यांची घरे येतात ती काढून नाला करावा कुणाची हरकत असणार नाही. वार्डातील प्रवाह पिसादेवी रोडकडे निघतो.

श्रीमती मेहरून्नीसा खान : ड्रेनेज,लाईटची कामे करू शकतोनसता बुस्टर प्लांट करावा. अनधिकृत वसाहत असेल तरी ड्रेनेज लाईन टाकता येईल.

मा.सभापती : डीपी प्लॅनमध्ये नाला येतो का किंवा नाही येत असेल तर पुढील बैठकीत माहिती द्यावी. डी.पी.प्लॅन पाहून नाला खुला करावा. 50 लाखात जे काम होते ते करावे. बुस्टर प्लॅन करता येत असेल तर पुढील बैठकीत माहिती द्यावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान : एस.टी कॉलनी औरंगाबाद टाईम्स भागात महापालिकेने बांधलेली संरक्षित भिंत तोंडून बोगस कागदपत्र तयार करून अनधिकृतपणे प्लॉटींग होत आहे या संदर्भात संबधीत अधिकारी यांना पत्र दिले काम बंद झाले नाही.

प्रशासकीय अधि. :संबधीत व्यक्तीस मालकी हक्काचे कागदपत्र सादर करण्यास व मार्कींग साठी कळविण्यात आले.

श्रीमती मेहरून्नीसा खान : 74 लाखाची संरक्षित भिंत बांधली होती. भरती टाकून जागा वाढवून प्लॉटींग केली.नाला अरूंद झाल्यामूळे लोकांच्या घरात पाणी जाते.वारंवार पत्र दिले इमारत निरीक्षक जातात वाटाघाटी करतात परत येतात कार्यवाही करीत नाही.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : दोन्ही बाजुने दगडी संरक्षित भिंतीचे काम केले आहे. 2/2.5 महिन्यापुर्वी गेलो होतो. एका बाजूने भिंत तोडल्याचे दिसून आले. वॉर्ड अधिकारी यांना कळविले होते.

श्रीमती मेहरून्नीसा खान : 2 संरक्षित भिंत तोडले. सपाटीकरण करून प्लॉटींग केली.

प्रशासकीय अधि. : इमारत निरीक्षकांना कार्यवाहीच्या सुचना दिल्या होत्या पुन्हा स्थळ पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती मेहरून्नीसा खान : महापालिकेची जागा बळकावीत आहे त्यांचेवर गुन्हा का दाखल केला नाही.

प्रशासकीय अधिकारी :मालकी हक्का बाबत कागदपत्र सादर करण्याचे लेखी कळविले आहे अभिलेख तपासून कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :या प्रकरणात पुढील बैठकीत सविस्तर माहिती ठेवावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान : बजेट फायनल न झाल्यामूळे कामे होत नाही धार्मीक स्थळे व इतर ठिकाणी चिखल झाला रस्त्याने चालता येत नाही मंच्छर डासाची संख्या वाढत आहे मुरूम टाकण्याचे आदेशीत करावे.

श्री.सिताराम सुरे :सनी सेन्टर व कामधेनू सोसायटीच्या संदर्भात मुद्या मांडला होता या बैठकीत माहीती देणार होते.

प्र.सहा.संचालक(न.र.) :डीपी प्लॅन मध्ये 45 मी.रस्ता आहे जागेवर 25 मीटर मिळतो.कामधेनू रेखांकनाला व सनी सेन्टरला बांधकामास महापालिकेनेच परवानगी दिली आहे. दोन्ही संचिकेची पाहणी केली असता दोन्ही ठिकाणी डीपी रोडचा उहापोह योग्य केलेला दिसतो. त्यासाठी परवानगी महापालिकेने दिली आहे.त्या रोडचे मोजमाप करून देण्यासाठी टीआयएलआर् यांचे कडे पत्र देवून कळविले आहे. मोजमाप करून दिल्यानंतर योग्य निर्णय घेता येईल कनिष्ठ अभियंता तेथे गेले होते त्यांनी पैसे भरणेसाठी पत्र दिले नाही ते देतो

म्हणून म्हटले पत्र प्राप्त होताच पैसे भरून मोजमाप करून सुपर इम्पोज करून स्थायी समितीकडे सादर करण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे : जुना डीपी प्लॅन हा 24 मी.चा असून त्यावेळेस कामधेनू हौ.सो.मंजूरी दिली त्यानंतर 2000 मध्ये रिवाईज डीपी प्लॅन झाला त्यात 45 मी. मंजूर केला.आता 25 मीटरच रस्ता आहे कुणी अतिक्रमण केले.

प्र.सहा.संचालक (न.र) : जागेवर आहे तेवढाच फक्त 45 मी. पुढे आणि मागे हा कमी रूंदीचा आहे.

श्री.सिताराम सुरे :जळगाव रोडपासून एमआयडीसीपर्यत 24 मीटर.सर्वे नं. 8 पासून ते 30 पर्यत 36 मी. जळगाव रोड 60 मी.असून तेथून मधला रस्ता 24 मी. नंतर 45 मीटर सरसकट 45 मीटर असायला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :24 मीटरचा सरसकट करता येत असेल तर करावा.

मा.सभापती : 45 मीटरला शासनाने मंजूरी दिली 24 मी. करण्याचे अधिकार आपल्याला नाही.

श्री.सिताराम सुरे : 24 मीटरचा करावा प्रशासकीय प्रस्ताव सादर करून त्यास सभागृहाची व शासनाची मंजूरी घेवून कार्यवाही करावी.

श्री.प्रशांत देसरडा :कामधेनू सोसायटी व उधारीमध्ये दिलेली परवानगी या दोन विषयावर वांरवार चर्चा होत अहवाल मागवावा.

प्र.सहा.संचालक (न.र.) :अहवाल देण्यासाठीच टीआयएलआर यांचेशी पत्रव्यवहार केला, मॅप आवश्यक आहे

श्री.प्रशांत देसरडा : दिलेली परवानगी किती फुटाच्या रस्त्यावर दिली होती तेवढी जागा सोडून इमारत झालेली आहे का? अतिक्रमण कुणी केले.हा अहवाल मागविला आहे.

प्र.सहा.संचालक(न.र.) : अतिक्रमण कुणी केले यासाठी टीआयएलआर चा मॅप आवश्यक आहे.

श्री.प्रशांत देसरडा : परवानगी दिलेली आहे.

प्र.सहा.संचालक(न.र.) : परवानगी देतांना दोन्ही ठिकाणी म्हटलेले आहे की रस्त्याचा बोध होत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :तसे लेखी अहवालात दयावे.

मा.सभापती :मागिल बैठकीत या संदर्भात अहवाल देण्याचे सुचना केल्या आहे 15 दिवसाचा अवधी दिला होता.येत्या बैठकीत अहवाल सादर करावा.जाफरगेट रविवार बाजार येथील दुकाने 8 दिवसाच्या आत काढण्या संदर्भात मा.आयुक्तांनी खुलासा करतांना निर्देश दिले होते त्या बाबतीत काय कार्यवाही केली.

प्रशासकीय अधिकारी या संदर्भाने दिं. 20-6-2009 रोजीच सदर दुकानास लिजवर भाडेपटटेवर जागा दिली का मालमत्ता विभागाला विचारणा करण्यात आली माहिती प्राप्त झाली नाही त्या अनुशंगाने दिं 23 तारखेला संचिका तयार करून अभिप्रायसाठी पाठविण्यात आली त्यात काही जागा लिजवर भाडेपटटेनी दिली का किंवा जागा संपादन करण्यासाठी पर्यायी जागा दिली आहे का याची पडताळणी करून भाडेपटटा रद्द करणे आवश्यक आहे का? या बाबी पडताळणीसाठी संचिका पाठविण्यात आली आहे.तेंव्हापासून संचिका या विभागास प्राप्त झाली नव्हती तथापी सभागृहाने दिलेला निर्णय व मा.आयुक्तांनी केलेले निर्देशानुसार दिं.25-7-09 संबधीतानी स्वत: काढून

| | |
|---|---|
| | घ्यावे अशा सुचना देण्यासाठी पथक गेले होते.त्या जागेवर अब्दुल गणी पि.शेख महेबूब हुसैन यांना जाफरगेट येथील महापालिकेतील जागा भाडे पटटेने दिलेचे भाडेपटटा पत्र त्यांनी साधारणत: 1991 कालावधीचे दिलेले आहे 1982 पासून जागा भाडेने दिल्याचे दिसून येते. |
| श्री.सतीष कटकटे | :मोढानाका ते जाफरगेट पर्यत डीपी रोड आहे. तीन दुकानांना परवानगी डीपी प्लॅन झाल्यावर दिली की अगोदर दिली |
| प्रशासकीय अधि. | :प्रत्यक्ष स्थळावर मिळालेले अभिलेख सभागृहात सादर केले आहे मालमत्ता विभागाकडून अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :प्रशासकीय विभागाकडून आलेल्या संचिकेवर अभिप्राय का दिला नाही.मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| मालमत्ता अधि. | : स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानुसार संचिकेला सर्व कागदपत्रे जोडली जाफरगेटची जागा महाराष्ट्र शासनाच्या नांवे पीआर कार्ड आहे. अद्याप महापालिकेची नाही यापुर्वीही निवेदन केले तीन दुकाने संदर्भात संचिका प्रशासकीय विभागाकडे दिली त्यासोबत पीआर कार्ड, झालेला करारनामा अस्तित्वात नाही हे स्पष्ट नमुद केले आहे. पुढील कार्यवाहीसाठी कळविले आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :दोन्ही अधिकारी यांनी केलेला खुलासा समजलेला नाही.स्पष्ट खुलासा असावा.भाडे पटटेने जागा दिली तो भाडेपटटा बोगस की बरोबर आहे. |
| मा. सभापती | : 3 दुकाना संदर्भात आहे का? |
| मालमत्ता अधिकारी. | :11 महिण्याचा करारनामा होता तो आज ग्राहय धरता येत नाही.असे स्पष्ट अभिप्राय दिला आहे. |
| मा.सभापती | :संबधीतांनी 1988 ची पावती दाखविलेली आहे 11 महिण्याचा करार होता दुकाने पाडण्यास काय अडचण आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :अधिकारी उत्तर बरोबर देत नाही संचिका मागवावी.त्यानुसार कार्यवाही करावी. |
| मा.सभापती | :सदर प्रकरणाची संचिका सभागृहात मागविण्यात यावी. |
| श्री. प्रशांत देसरडा | : ईआरपी संदर्भात मा.आयुक्त यांनी त्यांचे दालनात उदघाटन केले ते चालू झाले का ? |
| कार्य.अभि.(श्री.सोनवणे) | : मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांचे समक्ष ईआरपीचे उदघाटन झाले आज परीपुर्णपणे चालू आहे त्या त्या विभागाने त्यांना जसे आदेशीत केले त्याप्रमाणे काम करावे.सर्व विभागास पत्राने कळविले आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :ही संचिका ईआरपी मार्फत का आली नाही. |
| मालमत्ता अधि. | :मालमत्ता विभागात ईआरपी करून दिले ऑपरेट करण्यासाठी संगणक उपलब्ध नाही. |
| श्री.प्रशांत देसरडा | : कोणत्या विभागाचे ईआरपी मार्फत काम चालू झाले.चालू झाले नसेल तर त्या विभागावर कार्यवाही होणार की त्यांना मुदत देणार, रेकॉर्डचे व नगर रचना विभागाचे संचिकेचे स्कॅनींग करण्याचा हेतू होता. नगररचना मधील संचिकेचे स्कॅनींग झाले रेकॉर्डचे अदयाप झाले नाही.टाईम लिमीट दयावे ईआरपी मार्फत संचिकेची प्रोसेस चालू झाली पाहिजे. |

कार्य.अभि.(श्री.सोनवणे) : ईआरपी नुसार सर्व विभाग काम करू शकतात स्पील ओव्हरची कामे थांबवून ठेवली होती फायनल व्हायचे आहे.नवीन काम ईआरपी नुसार हाताळू शकतो.

श्री.प्रशांत देसरडा : जो विभाग ईआरपी चा वापर करणार नाही त्या अधिका-याची गैरहजेरी टाकावी. ईआरपी बाबात सदस्यांना माहिती दिली नाही.

मा.सभापती : ईआरपी संदर्भात पुढील सभेत सर्व सदस्यांना माहिती दयावी ईआरपीचा वापर कोणता विभाग करीत आहे याची माहिती व जो विभाग वापर करणार नाही कार्यवाही होईल.

श्रीमती मेहरून्नीसा खान : बचत गट धारकांना प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे.

प्रकल्प संचालक(श्री.सुर्यवंशी): सन 2005-06 च्या यादीनुसार 15697 कुटूंबे आलेली आहे मा.आयुक्तांच्या आदेशानुसार सर्व वार्ड कार्यालयाकडे प्रमाणपत्र वाटपासाठी दिले आहे या विभागाकडे कोणतेही प्रमाणपत्र शिल्लक नाही.वाटप करण्याचे काम चालू आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान : प्रमाणपत्र देण्यास कोणीही नाही.

उपआयुक्त (प्र.) : प्रत्येक वार्ड कार्यालयात एक क.लिपीक या कामासाठी आहे. प्रमाणपत्र काढून वार्ड अधिकारी यांची सही घेवून दिले जाते. वाटप करण्या बाबत वार्ड अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहे जर वाटपाची कार्यवाही वेळीच होत नसेल तर कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफिया : एक कोटीची ड्रेनेज सफाई मशीन आलेली आहे कोणत्या भागात साफसफाई करण्यात आली.

कार्य.अभि.(श्री.पानझडे): प्रत्येक झोनला 2-2 सिव्हर वॉटर व बकेट वॉटर मशीन आहे. प्रात्यक्षिक करून दाखविले होते. प्रत्येक झोनला नोटीसेस देवून टेंडर सुध्दा काढले होते त्या त्या झोनकडून टेंडरचे काम चालू आहे त्यांची रक्कम संपलेली आहे म्हणून काम बंद केले असावे असे कळते.येणा-या बजेटमध्ये पुन्हा तरतुद करून काम करता येईल.प्रत्येक वार्डात काम झाले आहे अभियंत्यानी पाहणी करून सर्टीफाईड केलेले आहे.ॲप्रुटींग ड्रेनेज लाईन करण्याची गरज पडू नये ही मशीन खरेदी केली आहे.प्रत्येक वार्ड कार्यालयासाठी 10 लक्षचे कामाचे टेंडर काढले होते ती रक्कम 3-4 महिण्यात संपलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : प्रत्येक वार्ड कार्यालयात या मशिनचे पार्ट अलग अलग केल्याचे दिसून येते. काम करणे आवश्यक असेल तर सलग चालू ठेवावे.बजेट मध्ये तरतूद असेल.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) : वार्ड अभियंता व कार्य. अभियंता यांनी त्या बाबतीत प्रोसेस करायला पाहिजे. वार्ड ब व क मध्ये काम चालू आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मशीन सध्या बंद आहे.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :माझेकडे असलेल्या वार्ड कार्यालय अंतर्गत या मशीनची कामे चालू आहे पुढील बैठकीत माहिती दिली जाईल.

श्री.सतीष कटकटे :चार महिण्यात ए-1 व रेटलिस्टची किती कामे झाली याची पुढील बैठकीत माहिती दयावी.

श्री.प्रशांत देसरडा :ए-1, रेटलिस्टची व ड्रेनेज सफाई मशीनद्वारे किती कामे झाली याची तीनही कार्य. अभियंता यांनी सविस्तर माहिती ठेवावी.

मा.सभापती :आताच स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे पुढील बैठकीत सर्व कार्य. अभियंता यांनी माहिती सादर करावी.

श्रीमती मोमीन सफिया : मांस विक्रेत्यांचे दुकानाचा परवाना बरोबर असून त्याचे नुतनीकरण करून दिले जात नाही. संबधीत अधिकारी लोकांना त्रास देत आहे. (यावेळी स.सदस्या मा.सभापती यांचेकडे काही दुकानचे कागदपत्र सादर करतात.)

श्रीमती मेहरून्नीसा खान : मटन, मासे, चिकन विक्रेत्यांना संबधीत अधिकारी यांचे कडून त्रास दिला जातो. त्यांचेवर काहीच कार्यवाही होत नाही.

श्रीमती मोमीन सफिया : मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांनाही संबधीत अधिकारी जाणूनबूजून त्रास देत आहे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी या बाबत खुलासा करावा.

संचालक(प्रांणी संग्रहालय) : ज्या ठिकाणी लायसन्स दिले नाही परंतु रस्त्यावर येवून मासे, मटन विक्री करतात त्यांचेबद्यल स.सदस्यांच्या तक्रारी होत्या त्यामूळे कार्यवाही करणे भाग पडते.

श्रीमती मेहरून्नीसा खान : रस्त्यावर अनेक लोक विक्री करतात त्या सर्वांवर कार्यवाही केली का?

श्रीमती मोमीन सफिया : संबधीत व्यक्तीचे लायसन्स हे 60-70 वर्षापुर्वीचे आहे.

संचालक(प्रांणी संग्रहालय): ज्यांची दुकाने बंदीस्त व नियमाचे पालन होत नाही त्यांचेवर कार्यवाही होत आहे.

मा.सभापती : माजी नगरसेवक श्री.अ.रशीद चौधरी यांचेकडे 100 वर्षापासूनचे लायसन्स आहे. परवाना नुतनीकरणासाठी त्यांचे मुळ लायसन्स आपण घेतले व नुतनीकरणही करून देत नाही ,काय कारण आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान : अशा पध्दतीने काम होत असेल तर कार्यवाही करावी.

श्रीमती मोमीन सफिया : रेल्वे स्टेशनच्या दुकाना संदर्भात त्या भागातील लोकांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

मा.सभापती : ते लोक मा. न्यायालयात गेले असेल तर व मा.न्यायालयाचे काही आदेश असतील तर सभागृहाला दाखवावे.

संचालक(प्रांणी संग्रहालय): रेल्वेस्टेशन भागातील लोक न्यायालयात गेले आहेत.मा. न्यायालयात महापालिकेच्या वतीने ॲफिडेव्हीट करून दिलेले आहे.

मा.सभापती : संबधीत लोक न्यायालयात गेले. मा. न्यायालयाने 100 वर्षाची दुकाने बंद करावे असे आदेश दिले असेल तर तात्काळ ते बंद करावे.मा.न्यायालय आदेश देईल या आशेवर महापालिकेचे कामकाज चालते का याचाही खुलासा करावा.मा.न्यायालयाच्या निर्णयाचे पालन सर्वांना करावे लागते मी पालन करतो दुकान बंद करण्याचे तसे आदेश असतील तर दाखवावे.

श्री.देसरडा प्रशांत : सदर दुकान नियमात बसते का?

संचालक(प्रांणी संग्रहालय): जे नियमात बसतात त्यांना लायसन्स दिले आहे ज्या बसत नाही त्यांचे रद्य करीत आहोत.दुकानमध्ये जाळी , काच बसविलेली पाहिजे ड्रेनेज लाईन जोडलेली असावी स्वच्छता असावी तसेच फिनॉईल तेथे असावे.

मा.सभापती :या शहरातील सर्वच दुकानदाराकडे वरील प्रमाणे आहे का, स्लॉटर हॉऊसवर या सर्व सुविधा आहेत का? ठराविक लोकासाठीच नियम आहे का?

संचालक(प्रांणी संग्रहालय) : जेथे जास्त रहदारी आहे, लोक जातात त्यामूळे तक्रारी येतात. सभागृह निर्णय धेईल त्या प्रमाणे कार्यवाही होईल. संबधीताचे लायसन्स रद्द केलेले नाही. दुकानामध्ये काही सुधारणा करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्या केल्यास कार्यवाही होणार नाही.

मा.सभापती :कुठेही खुलेआम मांसे, मटन विक्री होवू देवू नये असे आदेश मागिल बैठकीत दिले होते. ही 100 वर्षाची दुकाने आहे मा.न्यायालयाने बंद करण्याचे आदेश दिले असेल तर कार्यवाही करावी.रोजगारापासून कोणासही वंचीत करू नये.

'राष्ट्रगीता'नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद